**खटला क्र. ७२१/पीडब्ल्यू/२०१३** **निशाणी क्र. ३२**

साक्षीदार क्र. १

मी शपथपुर्वक सांगतो की,

माझे नाव : विशाल गंगाराम पाणगले,

वय : ४२ वर्षे,

व्यवसाय : खाजगी नोकरी,

पत्ता : शिंपोळी, बोरीवली (पश्चिम), मुंबई.

**सरतपासणी सरकारी वकील श्री. रविंद्र पाटील यांचे तर्फे:—**

१. मला एक सख्खा भाऊ असून त्याचे नाव राजेश असे आहे. आरोपी करण्यात आलेल्या घटनेच्या काळामध्ये मी आगार बाजार, चंद्रकांत धुरुवारी, दादर (पश्चिम), मुंबई येथे रुम नंबर १ मध्ये कुटुंबासह राहत असे. आमच्या कुटुंबामध्ये त्यावेळी मी, आई, भाऊ व त्याची पत्नी असे सदस्य होतो. मी सर्व आरोपींना ओळखतो. आरोपी हे आमच्या शेजारी राहत असे. आरोपी क्र. २ दिलीप हा सदया मयत आहे. आरोपी करण्यात आलेलया घटनेच्या काळामध्ये मयत दिलीप यास दोन अपत्य होते. मयत दिलीप याच्या मुलाचे नाव ओमकार (आरोपी क्र. १) तर मुलीचे नाव श्रुती असे आहे. माझे व श्रुती हिचे प्रेम संबंध होते. आमचे प्रेम संबंध श्रुतीच्या घरच्यांना मान्य नसल्याने माझ्यात व मयत दिलीप याच्या कुटुंबांमध्ये वाद होते.

२. दि. ०२.०६.२०१३ रोजी रात्री ११.०० ते ११.३० च्या दरम्यान मी रस्त्याने पायी चालत घेरी येत असताना ओमकार (आरोपी क्र. १) हा वाडीच्या ग्राऊंड समोरुन येत असताना मी पाहिले. त्यावेळी ओमकार (आरोपी क्र. १) हा माझयाकडे रागाने बघत होता. मी त्याच्याकडे रागाने बघण्याचे कारण विचारले. त्यावेळी मला ओमकार (आरोपी क्र. १) याने बेईनचोद, मादरचोद अशी शिवीगाळ केली. त्यानंतर आमच्यामध्ये बाचाबाची झाली. त्यानंतर ओमकार (आरोपी क्र. १) हा घरी गेला व सगळयांना घेऊन आला. त्या दिवशी त्या ठिकाणी दिलीप, ओमकार व राजन असे तिघेही वाडीमध्ये आले. त्यावेळी मी घरी जाण्यासाठी रस्ता चालत होतो. त्यावेळी ओमकार (आरोपी क्र.

१) याच्या  हातामध्ये कोयता होता. त्या कोयत्याच्या सहाय्याने ओमकार (आरोपी क्र. १) याने माझ्या उजव्या मानेच्या बाजुला वार केले. त्यामुळे माझे त्या ठिकाणचे हाड मोडून मला गंभीर दुखापत झाली. इतर दोन आरोपींनी मला हाताने मारहाण केली होती. त्यामुळे माझ्या उजव्या छातीच्या फासळीला/बरगडीला दुखापत झाली होती. सदरील भांडण पाहून माझा भाऊ राजेश हा त्या ठिकाणी मला वाचवण्यासाठी आला. ओमकार (आरोपी क्र. १) याने माझा भाऊ राजेश याच्या डोक्यावर कोयत्याच्या सहाय्याने वार केला. त्यामुळे राजेश हयाच्या डोक्याला दुखापत झाली. त्यानंतर मला माझा भाऊ राकेश जाधव व अभिजित जाधव या दोघांनी केईएम हॉस्पिटल येथे वैदयकिय उपचारासाठी दाखल केले. त्यापूर्वीच आरोपी हे घटनास्थळावरुन निघून गेले.

३. दुस—या दिवशी सकाळी केईएम हॉस्पिटला पोलीस हे माझ्याकडे चौकशी करण्यासाठी आले. त्यांनी माझ्याकडे चौकशी करुन माझा जबाब नोंदवून घेतला. मला आता माझा फिर्यादी जबाब दाखवण्यात आला. त्यावर माझी स्वाक्षरी नमूद आहे.  तो जबाब मी आता वाचून पाहिला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो जबाब **निशाणी क्र. ३३** वर आहे.

४. ज्या कोयत्याने ओमकार (आरोपी क्र. १) याने मला मारहाण केल्याचा आरोपी केलेला आहे त्याचे वर्णन मला सांगता येईल. त्या कोयत्याची अंदाजे ६ इंच लाकडी मुठ होती. त्या लाकडी मुठीच्या पुढे लोखंडी पाते हे अंदाजे १२ इंच एवढे होते. त्या लोखंडी पात्याची रुंदी ही अंदाजे २ इंचाची असावी. मला आता लोखंडी कोयता दाखवण्यात आला. तो लोखंडी कोयता मी ओळखतो. तो लोखंडी कोयता मी ओमकार (आरोपी क्र. १) याने मला मारताना पाहिला होता. तो तोच आहे. तो कोयता **आर्टीकल अ** वर दाखल आहे. आज न्यायालयात ओमकार व राजन हे दोन आरोपी हजर आहेत.

**<u>उलटतपास आरोपीकरीता ॲड. जगताप यांचेतर्फे :—</u>**

५. मी व आरोपी लहानपणापासून धुरुवाडी, आगार बाजार, दादर

पश्चिम या भागामध्ये राहतो. (साक्षीदाराने स्वत:हून असे सांगितले की, सन २०२० मध्ये त्याचा विवाह झाला व त्यानंतर तो बोरवली येथे वात्सव्यास गेला आहे.) माझा जबाब पोलीसानी घटनेच्या दुस—या दिवशी दवाखान्यात नोंदवला होता. मी पोलीसांना ज्या शस्त्राने आरोपी क्र. १ ने मला मारहाण केले आहे त्या शस्त्राचे लांबी, रुंदीसहीत वर्णन पोलीसांना सांगितले नव्हते.

६. मी रुग्णालयात उपचार घेताना डॉक्टरांना मला कुठल्या शस्त्रामुळे शरिरास जखम झालेली आहे त्याबाबतची माहिती सांगितली होती. परंतु ती मारहाण मला कोणी केली होती त्याचे नाव मी डॉक्टराना सांगितले नव्हती. मला मारहाण किती वाजता झाली त्याची वेळ स्वाक्षरी/— व तारिख मी माझ्यावर उपचार करणा—या डॉक्टरांना सांगितले नव्हती. असे काही घ डले नाही की, मी डॉक्टारांना घटना हि रात्री १०.०० वाजता घडल्याचे सांगितले होते.

**(न्यायालयाच्या प्रथम सत्राची वेळ संपल्याने पुढील उलटतपास दिनांक ०३.११. २०२५ पर्यंत तहकूब करण्यात येत आहे . )**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी/—
**(वैभव व. कुलकर्णी)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : ०१/११/२०२५.**